ePaper
कसब्याची हाताला साथ, चिंचवडध्ये पुन्हा कमळ!



| वर्ष - 6 | अंक - 316 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- विजयाचा गुलाल आणि मिरवणुकीची धमाल!
- मतविभागणीमुळे पराभव!
- भाजपाच्या उमेदवार अश्विनी जगताप यांचा दमदार विजय


www.mahaenews.com | शुक्रवार , दि. 3 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चिंचवडमध्ये 'कमळ'च!

## »अश्विनी जगताप यांचा दमदार विजय : नाना काटे, राहुल कलाटे पराभूत

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे वर्चस्व कायम ठेवत एवढ्या मतांनी अश्विनी जगताप विजयी झाल्या. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनाने रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवडणूक होती. अश्विनी जगताप यांनी बाजी मारत महाविकास आघाडीचे नाना काटे यांचा 36 हजार 770 एवढ्या मतांनी पराभव केला.**

मतमोजणीला सुरुवात झाल्यापासूनच अश्विनी जगताप यांनी आपली आघाडी कायम ठेवली होती. कसबा पोटनिवडणुकीत भाजपचा पराभव झाला पण, चिंचवडची जागा राखण्यात भाजपला यश आले आहे. यामध्ये अश्विनी जगताप यांना 135494 एवढी मते मिळाली असून नाना काटे यांना 99424 एवढी मते मिळाली. तर, यामध्ये चर्चेत असणारे उमेदवार राहुल कलाटे यांनाही 40075 इतकी मते मिळून पराभव पत्कारवा लागला.

मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच पाच ते दहा हजार मतांच्या आघाडीने अश्विनी जगताप आघाडी वरती होत्या. त्यात नाना काटे आणि राहुल कलाटे यांचा बालेकिल्ला असणाऱ्या पिंपळे सौदागर, वाकड, रहाटणी परिसरातील मतदान मोजणी पूर्ण झाली आहे. या ठिकाणी जगताप यांनी आपली आघाडी कायम ठेवली होती. त्यानंतर झालेल्या मत मोजणीत सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव या भागातील मतमोजणीला सुरुवात झाली. त्यावेळी १० हजाराचे आघाडीवर असणाऱ्या जगताप यांनी थेट २५ हजारांच्या पेक्षा अधिक मतांची आघाडी घेतली शेवटपर्यंत ती ३६ हजाराहून अधिक झाली आणि अश्विनी जगताप विजयी झाल्या.





### मतदान आकडेवारी :

| | |
|---|---|
| » अश्विनी जगताप | – 1, 35, 434 |
| » नाना काटे | – 99, 343 |
| » राहुल कलाटे | – 44, 082 |

“ **दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभेत केलेल्या विकासकामाच्यामुळेच आज जनतेने भरभरून मतदान दिले आहे. राहुल कलाटे यांनी बंडखोरी केल्याचा देखील फायदा झाला आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभेत केलेल्या विकासकामाच्यामुळेच आज जनतेने भरभरून मतदान दिले आहे. मी हा विजय सर्वसामान्य जनतेला आणि लक्ष्मण जगताप यांना समर्पित करते. भाजपाचे नेते, कार्यकर्ते आणि जनतेला माझ्या पाठिशी उभे राहिल्याबद्दल धन्यवाद देते. अशा पद्धतीने निवडणूक लढवावी लागेल, असा विचार मी कधीच केला नव्हता. लोकांसाठीची लक्ष्मण जगताप यांची अपुरी राहिलेली कामं आहेत, ती पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.**

- अश्विनी जगताप, आमदार.

### ...हा विजय दिवंगत लक्ष्मण जगताप यांना समर्पित : आ. लांडगे

» पिंपरी-चिंचवडकरांनी विकासाच्या मुद्द्यांवर मतदान केले. दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी शहराच्या प्रगतीमध्ये मोठे योगदान दिले आहे. त्याचे स्मरण इथल्या भूमिपुत्रांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी ठेवले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीत स्वत: लक्ष घातले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांवर विश्वास ठेवून सर्व विरोधी पक्ष एकत्र आल्यानंतरसुद्धा अत्यंत प्रतिष्ठेच्या झालेल्या निवडणुकीत मतदारांनी भाजपा-शिवसेना महायुतीवर विश्वास दाखवला. त्याबद्दल सर्व मतदारांचे आभार व्यक्त करतो. या निवडणुकीत रात्रं-दिवस मेहनत घेणारे महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या एकत्रित लढ्याचा हा विजय आहे. शहराच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेला हा विजय आम्ही दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना समर्पित करतो.



### पराभवाची भीती म्हणून पैसे वाटले : नाना काटे

सगळे कार्यकर्ते प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचले. पण बंडखोरीचा फटका नक्कीच बसला आहे. कारण कलाटेंना झालेलं मतदानही मविआचंच आहे. त्यातली काही मतं वंचित बहुजन आघाडीची असू शकतील. मतदान होण्याच्या दोन दिवस आधी सत्ताधाऱ्यांनी आमचे बरेच कार्यकर्ते पोलीस बळ वापरून उचलले होते. त्यानंतर पैशांचा मोठ्या प्रमाणावर इथे वापर झाला. सर्व कार्यकर्ते संपूर्ण चिंचवड मतदारसंघात पुन्हा काम करतील आणि आम्ही जोमानं काम करू. सहानुभूती असती तर पैसे वाटलेच नसते. असा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांनी केला आहे.



### राहुल कलाटे यांचे डिपॉझिट जप्त

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्याकडून तब्बल ३८ हजारांनी पराभव पत्करल्यानंतरही जनतेच्या मनातला आमदार म्हणून फ्लेक्सबाजी करणारे राहुल कलाटे यांना आता झालेल्या पोटनिवडणुकीत मतदारांनी चांगलाच दणका दिला आहे. पोटनिवडणुकीच्या निकालानंतर राहुल कलाटे यांच्यासह २६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. डिपॉझिट जप्त होण्याची नामुष्की ओढवू नये यासाठी राहुल कलाटे यांना ४७ हजार ६६६ मते पडणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्यांना ४४ हजार ८२ मते पडली आहेत. त्यामुळे आमदारकीला डिपॉझिट जप्त झालेला उमेदवार अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे.



# विजयाचा गुलाल आणि मिरवणुकीची धमाल!



## » कसब्यात महाविकास आघाडीचे रविंद्र धंगेकर विजयी

।पुणे । महाईन्यूज ।

कसबा पेठ विधानसभा पोट निवडणुकीत काँग्रेसचे रविंद्र धंगेकर विजयी झाले असून भाजपचे हेमंत रासने पराभूत झाले आहेत. धंगेकार हे ११ हजार ४० मतांनी विजयी झाले आहेत. कसबा मतदारसंघात भाजपाच्या बालेकिल्ल्यात मुसंडी मारून विजयी झालेले महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणजे रवींद्र धंगेकर यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली होती. भाजपाच्या हेमंत रासने यांचा पराभव केल्यानंतर कसबा मतदार संघात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून अत्यंत थाटामाटात रवींद्र धंगेकरांचं स्वागत केले.



### अभिजित बिचुकले आणि आनंद दवे यांना किती मते मिळाली?

» विविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत राहणारी दोन व्यक्तिमत्त्वे कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरली होती. विविध निवडणुकांचा प्रदीर्घ अनुभव असलेले अभिजित बिचुकले आणि ब्राह्मण महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद दवे या उमेदवारांबाबत अनेकांना उत्सुकता होती. जाणून घेऊयात...या दोन उमेदवारांना किती मते मिळाली? अभिजित बिचुकले यांना तीन आकडी मते तर सोडाच पण साधं मतांचं अर्धशतक पण पूर्ण करता आलेलं नाही. बिचुकले यांच्या झोळीत मतदारांनी केवळ 47 मतं टाकली आहे.भाजपने ब्राह्मण उमेदवार न दिल्याचा निषेध करीत ब्राह्मण महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद दवे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. त्यांना मतांचं त्रिशतक देखील गाठता आलं नाही. त्यांना केवळ 296 मतांवर समाधान मानावं लागलं आहे.

रवींद्र धंगेकर हे सुरूवातीला मनसेत होते. त्यानंतर ते काँग्रेसमध्ये गेले. काँग्रेसने त्यांना आमदारकीचं तिकिट कसबा पोटनिवडणुकीत दिलं त्याच संधीचं सोनं केलं. रवींद्र धंगेकर यांनी करून दाखवलं. गुलाल, हार, फटाके महाविकास आघाडीचा विजय असो रवी धंगेकर आगे बढो हम तुम्हारे साथ है या घोषणांनी कसबा दुमदुमला होता.

रवींद्र धंगेकर यांनी सगळ्या कार्यकर्त्यांना आणि मतदारांना अभिवादन केलं. रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या हेमंत रासनेंना धोबीपछाड दिल्याने भाजपाच्या २८ वर्षाचा बालेकिल्ला भाजपाकडून हिरावून घेतला आहे. रवींद्र धंगेकर यांच्या या कामगिरीचं अजित पवारांनी तोंडभरून कौतुक केलं आहे. रवींद्र धंगेकर यांच्यासोबत कार्यकर्त्यांनीही जल्लोष केला. रवींद्र धंगेकर यांनीही पत्रकार परिषद घेत भाजपाच्या पराभवाची ही सुरूवात झाली आहे असं म्हटलं आहे.

### देवेंद्र फडणवीस म्हणतात, 'आम्ही पुन्हा येऊ'

» भाजपचा कसब्यामध्ये पराभव तर चिंचवडमध्ये विजय झाल्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तसेच, 'आम्ही पुन्हा येऊ' म्हणत पुढच्या वर्षीची कसब्यातील जागा मिळवण्याचा निश्चय केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की चिंचवड विधानसभा क्षेत्रातून आमच्या भाजपा उमेदवार अश्विनीताई जगताप या विजयी झाल्या. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि विकासाला साथ देणाऱ्या चिंचवडवासियांचे मनापासून आभार! स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांना ही भावपूर्ण आदरांजली आहे, असे त्यांनी म्हंटले. तर, कसब्यातील जनतेचे सुद्धा मनापासून आभार म्हणत ते पुढे म्हणाले, की जनतेने आम्हाला आशीर्वाद दिले आहेत. थोडे कमी आशीर्वाद मिळाले असले, तरी त्यांनी दिलेल्या जनादेशाचा स्वीकार करतो. पण, एक नक्की सांगतो, आपले आशीर्वाद मागण्यासाठी 'आम्ही पुन्हा येऊ'! असे म्हंटले आहे.



# पैशांच्या जोरावर मराठी माणसाला विकत घेता येत नाही!

## » सुप्रिया सुळेंचा भाजपाला टोला

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजपाचा बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या कसबा मतदार संघात रवींद्र धंगेकर यांचा विजय झाला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या हेमंत रासनेंचा १० हजार ५०० मतांनी पराभव केला आहे. या निकालानंतर विविध प्रतिक्रिया येत आहेत. अशात राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही भाजपाला टोला लगावला आहे. पैशांच्या जोरावर मराठी माणसाला विकत घेता येत नाही असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे.



महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर हे मूळचे आपल्या बारामती लोकसभा मतदारसंघातले आहेत. त्यांचा विजय हा आनंद द्विगुणित करणारी बाब आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी केलेल्या संघटित प्रयत्नांचा हा विजय आहे. मराठी माणूस पैशांत विकला जात नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. राजकीय पक्षापेक्षा हा विजय कार्यकर्त्यांचा आहे. त्यामुळे या विजयाचं खरं श्रेय कार्यकर्त्यांना जातं असंही सुप्रिया सुळे यांनी म्हटलं असून भाजपाला टोला लगावला आहे. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या प्रतिक्रियेत सुप्रिया सुळेंनी हे वक्तव्य केलं आहे.२८ वर्षे भाजपचा बालकिल्ला राहिलेल्या कसबा मतदारसंघात सत्तांतर

### रवींद्र धंगेकर यांनी विजयानंतर काय म्हटलं

»कसब्यात पैशांचा धूर झाला. पैशांच्या धुरात भाजपा आणि शिंदे सरकार जळून खाक झालं आहे. पण महाराष्ट्रातल्या राजकारणाची चांगली परंपरा म्हणून मी गिरीश बापट यांची भेट घेणार आहे. ते ज्येष्ठ नेते आहेत. ते इतका काळ या ठिकाणी खासदार होते त्यामुळे मी त्यांची भेट घेऊन आशीर्वाद घेणार आहे. कसब्यातल्या या निवडणुकीत भाजपाने खूप पैसा ओतला. मागचे पंधरा दिवस पैशांचा पाऊस पडला होता पण लोकांनी त्यांना जागा दाखवली असंही रवींद्र धंगेकर यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत बोलून दाखवलं आहे.

झालं आहे. रविंद्र धंगेकर यांना एकूण ७३ हजार १९४ इतकी मते मिळाली असून त्यांनी ११ हजार ४० मतांनी विजय मिळवला आहे. भाजपासाठी हा खूप मोठा धक्का मानला जातो आहे. कारण भाजपाने ही निवडणूक जिंकण्यासाठी सगळी प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र या निवडणुकीत भाजपाला पराभव सहन करावा लागला आहे.

# मतविभागणीमुळे पराभव!

## विरोधी पक्षनेते अजित पवार : राहुल कलाटे यांना समजावलं पण...

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी आणि भाजपामध्ये 'काटे' की टक्कर झाल्यानंतर अखेर भाजपाच्या अश्विनी जगतपा यांचा विजय झाला आहे. अश्विनी जगताप यांनी 1 लाख 35 हजार 603 मते मिळवली तर राष्ट्रवादीचे उमेदवार नाना काटे यांनी 99 हजार 435 मतं मिळाली. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी 44 हजार 112 एवढी मतं घेतली. राहुल कलाटे यांच्यामुळे मतविभागणी होऊन राष्ट्रवादीचा पराभव झाल्याचे बोलले जात आहे. वास्तविक असा पराभव होईल, असे भाकित विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीच वर्तविले होते.**



यावेळी त्यांनी मागच्या विधानसभा निवडणुकीची आठवण करुन दिली. ते म्हणाले, त्यावेळेस मीच राहुल कलाटेला अपक्ष उभा केले होते. तेव्हा त्याला सव्वा लाख मतं मिळाली होती. पण ती मतं त्याची नव्हती. हे आता त्याला समजले असेल. मतविभागणी होऊन आमचा पराभव झाला, हे अजित पवार यांनी मान्य केले.

> **राहुलमुळे आमचा पराभव झाला असे आम्ही मानत नाही. दोन्ही आमचेच उमेदवार होते. मतांची विभागणी होऊन भाजपाचा उमेदवार विजयी झाला. उमेदवारीच्या बाबतीत काहीही झालं तरी आमच्यात कुणीही बंडखोरी करु नये, याची काळजी आम्हाला घ्यावी लागेल.**
>
> **- अजित पवार, विरोधी पक्षनेते**

### काय म्हणाले होते अजित पवार?

**अजित पवार म्हणाले, "राहुल कलाटे आणि नाना काटेंची मतं एकत्र केली, तर ती भाजपाच्या उमेदवारापेक्षा जास्त आहेत. याचा अर्थ, पुढच्या निवडणुकीत आमच्यामध्ये बंडखोरी होता कामा नयेत, ही काळजी घेणं गरजेचं आहे. अर्ज भरल्यानंतर मी राहुल कलाटेला सांगण्याचा खूप प्रयत्न केला. पण राहुलनं माझं ऐकलं नाही. सगळ्याप्रकारे त्याला सहकार्य करण्याचं काम राज्यकर्त्यांनी केलं. मी चिंचवडमध्ये प्रचार करत असताना मला माहिती मिळत होती. राहुल आणि नानाची मते पाहिली तर ती भाजपाच्या उमेदवारापेक्षा जास्त आहेत. महाराष्ट्रामध्ये एक मेसेज नक्कीच गेला आहे की, तीन पक्षांनी एकत्र येऊन निवडणूक लढवली तर निवडणूक जिंकता येते. फक्त निवडणुकीसाठी निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवाराला तिकीट दिले गेले पाहीजे. मग तो कोणत्याही पक्षाचा असो."**

### तेव्हा मीच त्याला अपक्ष उभं केलं होतं

**"मागच्यावेळी लक्ष्मण जगतापांच्या विरोधात मीच राहुलला अपक्ष उभं राहण्यास सांगितलं होतं, त्या निवडणुकीत राहुल कलाटेला लाखांपेक्षा जास्त मतं मिळाली होती. त्याला वाटलं ही माझीच मतं आहेत. ती मतं त्याची नसून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची होती. मला उद्या बारामतीमध्ये लाख मतं मिळाली तर ती माझी मतं नसतात तर ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची असतात. ती कार्यकर्त्यांनी, मतदारांनी दिलेली असतात. मी राहुलला सांगितलं की, बाबा ही मतं तुझ्या एकट्याची मतं नव्हती. पण राहुल ऐकायला तयार नव्हता. आता राहुलला त्याची खरी मतं कळली असतील पण त्याच्यामुळं आमचा उमेदवार पडला, हे सत्य आहे.", अशा शब्दात अजित पवार यांनी राहुल कलाटेला टोला लगावला.**

---

# अश्विनी जगताप यांच्या विजयाने सुपनेकर आनंदीत!

## गावची लेक विधिमंडळात पोहोचली : गावकऱ्यांचा उर आला भरुन

।कराड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवडच्या पोटनिवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मणराव जगताप यांच्या पत्नीअश्विनी जगताप यांच्या विजयानंतर कराड तालुक्यातील सुपनेतील SUPANE ग्रामस्थांना मोठा आनंद झाला आहे. सुपने गावची लेक विधिमंडळात आमदार होऊन पोहोचल्याने सुपनेकरांचा उर अभिमानाने भरुन आला आहे.**



आमदार अश्विनी जगताप या सुपने येथील निवृत्त पोलिस उपायुक्त मारुती बंडु जाधव यांच्या कन्या आणि कऱ्हाड मर्चंटचे संचालक आकाश जयवंत जाधव यांच्या आत्या आहेत. मारुती जाधव हे पोलिस खात्यात असल्याने करारी शिस्त अश्विनीताईमध्ये आली आहे. मारुती जाधव यांना राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते राष्ट्रपती पदक मिळाले होते.

वडील पुण्यात स्थायिक झाल्याने अश्विनीताईंचे शिक्षण पुण्यात झाले. त्यांना एक भाऊ आणि पाच बहिणी असे त्यांचे कुटुंब आहे. त्यांची एक बहिण सौ. सुनंदा यांना कऱ्हाडधील दिवटे गल्लीतील पवार कुटुंबात दिल्या आहेत. तर अन्य बहिणी विवाहानंतर पुणे परिसरातच आहेत.

सुपनेचे आकाश जयवंत जाधव यांच्या त्या आत्या आहेत. कऱ्हाड मर्चंट संस्थेचे ते संचालक आहेत.

अश्विनी जगताप या चिंचवडच्या निवडणुकीत विजयी झाल्याने कऱ्हाड तालुक्यातील सुपनेची माहेरवाशीनी विधीमंडळात पोहोचल्याने सुपनेकरांचा उर अभिमानाने भरुन आला आहे.

> **आमदार लक्ष्मणराव जगताप हे खुपच दिलदार आणि प्रभावी व्यक्तीमत्व होते. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आणि माझी आत्या अश्विनी जगताप यांना भाजपने उमेदवारी दिली. त्यांच्या विजयाचा आणि त्या विधीमंडळात गेल्याचा आम्हा सुपनेकरांना मोठा अभिमान आहे.**
>
> **- आकाश जाधव, नातेवाईक, सुपने.**

---

# नैतिकदृष्ट्या हा भाजपचा पराभवच - अजित गव्हाणे

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपने साम, दाम, दंड, भेदाचा केलेला वापर, सत्तेचा गैरवापर, पैशांचा महापूर निर्माण केल्यानंतरही त्यांना 2019 च्या तुलनेत 15 हजार मते कमी पडली. तर विरोधातील मतांमध्ये 30 हजारांची वाढ झाली हे आजच्या मतमोजणीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे भाजपचा चिंचवडमध्ये नैतिकदृष्ट्या पराभवच झाला आहे, अशी प्रतिक्रीया राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिली आहे.

चिंचवड विधानसभा निवडणुकीची आज मतमोजणी पूर्ण झाली. राष्ट्रवादीचे उमेदवार नाना काटे यांना तब्बल १ लाखांच्या जवळपास मते पडली. यानंतर अजित गव्हाणे यांनी ही प्रतिक्रीया दिली आहे. अजित गव्हाणे म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांना मिळालेली मते ही लक्षणीय आहेत. बंडखोर उमेदवाराची मते आणि नाना काटे यांच्या मतांची बेरीज केल्यास ती अश्विनी जगताप यांच्यापेक्षा अधिक होतात. या पोटनिवडणुकीत भाजपने सत्तेचा गैरवापर केल्यानंतरही त्यांना 2019 च्या तुलनेत 15 हजार मते कमी पडली आहे. विशेष म्हणजे गतवेळच्या निवडणुकीपेक्षा 9 हजारांनी मतदान अधिक झाल्यानंतरही त्यांना कमी पडलेली मते म्हणजे जनतेचा कौल हा भाजप विरोधातील आहे.

## संपादकीय »

# पाहावे संहाराच्या पलीकडे

***युरोप आणि मध्य आशियातील विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना युद्धामुळे भविष्यात निरनिराळ्या आर्थिक समस्यांना तोंड द्यावं लागणार, अशी परिस्थिती निर्माण होतेय. या आव्हानाला सामोरे जाण्याची तयारी करणे महत्त्वाचे आहे.***

युद्ध म्हटले की संहार आलाच. अशा संहारात्मक परिस्थितीतही युक्रेनची अर्थव्यवस्था बळकट करण्याकडे प्रयत्न होतोय. रशियासारख्या मंदीग्रस्त अर्थव्यवस्थेला जाचक निर्बंधातूनदेखील विकास साधण्याची वेगळी वाट सापडते आहे. युरोप आणि मध्य आशियातील विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना युद्धामुळे भविष्यात निरनिराळ्या आर्थिक समस्यांना तोंड द्यावं लागणार, अशी परिस्थिती निर्माण होतेय. जागतिक बँकेच्या अहवालानुसार महासाथीनंतर युरोप आणि मध्य आशियातील अर्थव्यवस्था सुधारतील आणि सावरतील ही आशा युद्धामुळं मंदावतेय. या अर्थव्यवस्थांचा किमान विकासदर २०२३ मध्ये ०.३ टक्के राहील. नैसर्गिक वायू, तेल, ऊर्जा, अन्नधान्य, खत, कच्चा माल या साऱ्यांच्या किमती वाढतच राहतील. युक्रेनच्या अर्थव्यवस्थेत उत्पादन ३५ टक्क्यांनी घसरण्याचा अंदाज केला गेला आहे. उत्पादन क्षमतेतील घसरण, शेतीतल्या उत्पादनाला बसलेला फटका, नोकरदार आणि सर्वसामान्य लोकांचं स्थलांतर यांसारख्या आर्थिक प्रश्नांची तीव्रता युक्रेनमध्ये वाढत चालली आहे. अंदाजे एक कोटी ४० लाख लोकांच्या स्थलांतरामुळे श्रमपुरवठ्यात मोठी घट होताना दिसते आहे.युक्रेनच्या पुनर्रचनेसाठी लागणारी आर्थिक मदत ३४,९०० कोटी डॉलरच्या घरात आहे, असं जागतिक बँकेचा अहवाल सांगतो. युद्धाच्या या बिकट वाटेतून युक्रेन ताठ मानेनं पुढे चालतो आहे. बँकिंग व्यवस्था, देणी व्यवहार, वित्तीय क्षेत्रातल्या आर्थिक घडामोडी युक्रेननं सुरळितपणे पार पडतील याची दक्षता घेतली आहे. भांडवल देशाबाहेर जाऊ न देणं, स्थिर विनिमयदर पद्धती यशस्वीपणे राबवणं आणि आर्थिक आरिष्ट येऊ नये म्हणून पैसाविषयक आणि वित्तीय उपायांची खबरदारी घेणं या आवश्यक आर्थिक गोष्टींना युक्रेननं खीळ बसून दिली नाहीये.

# कसब्याचा कडू काढा!






तीन राज्यांतील विधानसभा आणि अन्य चार राज्यांतील विधानसभा पोटनिवडणुका याचे निकाल अजिबात अनपेक्षित नाहीत. ईशान्येतील तीनही राज्यांत भाजपची थेट वा अन्य स्थानिक पक्षाच्या आघाडीसमवेत सत्ता होती. ती भाजपने राखली. त्रिपुरात सत्ताधारी भाजप हा विरोधातील डावे-काँग्रेस आघाडीस पराभूत करताना दिसतो. हा पराभव किती निर्णायक हे पाहणे औत्सुक्याचे. याचे कारण असे की या राज्यात तीन दशकांहून अधिक काळ डाव्यांची सत्ता होती. पण त्यांना हटवून भाजपने आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे पश्चिम बंगाल वा केरळात एकमेकांविरोधात लढणारे डावे आणि काँग्रेस हे त्रिपुरात एकमेकांस हात देते झाले. तथापि हे सहकार्य निरुपयोगी ठरेल असे दिसते. भाजपने बहुमताचा टप्पा पार केला असून आणखी किती मुसंडी तो पक्ष मारतो ते पाहायचे. याच्या तुलनेत मेघालयात विधानसभा त्रिशंकू असेल असे दिसते. तेथे कॉनरॅड संगमा यांच्या पक्षास आधिक्य आहे. पण ते सत्तास्थापनेस पुरेसे नाही. वास्तविक संगमा आणि भाजप हे येथे सत्तेत होते. पण निवडणुकीपुरती त्यांनी आपली आघाडी मोडली. कारण संगमा प्राधान्याने ख्रिस्ती मतदारांस आवाहन करीत असताना शेजारी भाजप असणे बरोबर नाही, हे चातुर्य उभयतांनी दाखवले. आता निवडणुका झाल्यावर त्यामुळे हे दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र नांदू शकतील. शेजारील नागालँडमध्ये भाजप आणि स्थानिक नॅशनल डेमॉक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी यांची आघाडी बहुमताकडे निघाल्याचे चित्र आहे. तो त्यांचा प्रवास रोखण्याइतकी ताकद विरोधकांकडे निश्चितच नाही. या राज्यांतील यश भाजपसाठी जितके देदीप्यमान तितकेच काँग्रेससाठी काळेकुट्ट ठरते. ही सर्व राज्ये एके काळी काँग्रेसचा बालेकिल्ला होती. पण यथावकाश अन्य बालेकिल्ल्यांप्रमाणे काँग्रेसने आपल्या कर्माने त्यावर पाणी सोडले. याचे श्रेय काँग्रेसच्या नाकर्तेपणाइतकेच भाजपचे वैचारिक कुल असलेल्या रा.स्व. संघाच्या कर्तेपणास द्यावे लागेल. त्या राज्यांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांची राजकीय पाळेमुळे संघाने सातत्यपूर्ण प्रयत्नांतून उखडून टाकली हा निष्कर्ष भाजपच्या निकालातून निघाल्यास त्यात गैर नाही. तेव्हा अशा तऱ्हेने या निवडणूक वर्षांची सुरुवात भाजपने मोठ्या झोकात केली, असे म्हणावे लागेल.त्यास महाराष्ट्रातील निकालाने मात्र खीळ बसते. महाराष्ट्रातील दोनपैकी एक विधानसभा निवडणूक भाजपने गमावली. पण केवळ 'एक जागा' या शब्दाने या पराभवाची महती लक्षात येणार नाही. कारण हा पराभव कसबा या भाजपच्या पारंपरिक बालेकिल्ल्यातील आहे. भाजपने कसबा गमावण्याची तुलना दिल्लीने संसद इमारत वा इंडिया गेट गमावणे याच्याशीच होऊ शकेल. पूर्वीच्या काळी शाळेत जेव्हा 'टीचर'च्या जागी शुद्ध शिक्षक वा पंतोजी होते, त्या वेळी खोडकर विद्यार्थ्यांस छडय़ा मारताना ते 'दहा मारून एक मोजेन' असे म्हणत. एका कसब्यातील भाजपचा पराभव हा असा दहा मतदारसंघांतील पराभवांच्या बरोबरीचा ठरतो. या मतदारसंघात ब्राह्मण मतदारांचे प्रमाणही लक्षणीय. ज्यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली त्या मुक्ता टिळक यांच्या कुटुंबातील कोणास उमेदवारी न देता भाजपने भलताच उमेदवार मैदानात उतरवला. हा मतदारसंघ गिरीश बापट यांनी जवळपास तीन दशके जोपासलेला. ते आजारी आणि टिळक यांच्या कुटुंबातील कोणालाही उमेदवारी न देण्याचा भाजपचा अनुदारपणा! यामुळे सुरुवातीपासूनच भाजपच्या विरोधात कसब्यात वातावरण होते. स्थानिक देवस्थान प्रमुख, रा. स्व. संघाचे कार्यकर्ते, राज्यभरातील भाजप नेत्यांचे कसबास्थित नातेवाईक वा परिचित यांच्याशी संधान साधून भाजपने ते कमी करण्याचा प्रयत्न केला. शेवटच्या टप्प्यात तर निवडणूक हातातून निसटणार हे लक्षात आल्यावर खुद्द देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही तेथे तळ ठोकला आणि सर्व 'साधनसामग्री' मुक्तपणे वापरली.

**आपल्या समाजात मानसोपचाराला खूप दुय्यम महत्त्व आहे. आयुष्याला कलाटणी देणारी ही उपकारक ट्रीटमेंट वेडाशी निगडित करून महत्त्व कमी करून टाकलं आहे. पण वेड म्हणजे काय?**

# सामान्य-असामान्य : खोटी 'वेडी' ठरवणार



दोष मान्य करायचा नाही. तसंच आयुष्य ढकलत राहायचं, नुकसान सोसत राहायचं, इतरांना सोसायला भाग पाडायचं. त्यासाठी कुठल्याही थराला जायचं. स्वतःत बदल करून घ्यायचा नाही. आयुष्य सुधारून घ्यायचं नाही. सायकियाट्रिस्टचा रागराग करायचा. त्यांचे सल्ले धुडकावत राहायचं. त्यांना खोट्यात पाडायचं.

आपला समाज आता खूप सुशिक्षित, मॉडर्न झाला आहे. 'जेन नेक्स्ट', 'यंग इंडिया' तर फार जागरूक आहे असं म्हटलं जातं; पण मानसोपचाराची जागरूकता स्वतःला अल्टामॉडर्न समजणाऱ्या तरुण पिढीतही नाही. नुसतं मोबाईल, सोशल मीडिया, फालतू फॅशन, हिरोगिरी दाखवणारी मूर्ख धाडसं, व्यसनं एवढीच हाय-फाय किंवा अल्ट्रा मॉडर्न झाल्याची लक्षणं आहेत. आयुष्यात प्रसंग आल्यावर हे हिरोज् कोसळताना दिसतात. कारण विचारसरणी किंवा सुसंस्कृतपणा विकसित नाही.

दिलीप कारंडे एक सुशिक्षित तरुण. घरचं सगळं व्यवस्थित, नोकरी चांगली. सीमा बेनकरशी वेळच्या वेळी लग्न झालं. सीमाही चांगली रुळली. दीड वर्षात पाळणाही हलला. सीमाला आनंद होईल असंच सगळ्यांना वाटलं होतं; पण ती विचित्रच वागायला लागली. केस पिंजारत एकटक बघत राहायची. तुटकतुटक वागायला लागली. बाळाला घ्यायची नाही, त्याला दूध पाजायची नाही, बाळ दिलं तर ढकलून द्यायची. तिचं हे रूप पाहून सगळ्यांच्या छातीत चर्र झालं. तिच्या मावशी म्हणाल्या, "पहिलटकरीण आहे. होतं असं कधी कधी." दोन दिवसांनी आई-वडील आले. त्यांच्याकडे पाठ फिरवून बसली. तेही म्हणाले, "होतं असं कधीकधी." तिचा विचित्रपणा वाढतच गेला. नुसतं पडून राहणं, अस्वच्छ राहणं याच्या जोडीला पुटपुटणं, स्वतःशी हसणं सुरू झालं. जेवण चिवडत बसायची. हळूहळू सीमाचं 'वेड' वाढत गेलं. एकटीच बडबडत बसायची, हातवारे करायची. तंद्री मोडली, तर संतापानं थयथयाट करायची.दिलीप माझ्याकडे आला. सीमा येणार नव्हती, आणणंही शक्य नव्हतं, मी कौन्सिलिंग केलं. आजार व उपचार यांच्याबाबत समजावून सांगितलं. तिच्या आई-वडिलांचा सहभाग आवश्यक असल्याचं सांगितलं. दिलीपनं त्यांना बोलावणं पाठवलं. ते यायला तयार नव्हते. कसंतरी पटवून त्यांना आणलं.

बेनकर कुटुंबीय म्हणून ७, ८ माणसं माझ्या खोलीत शिरली. आल्यापासून 'झू'मधील प्राणी बघावा तसं माझ्याकडे बघत होते. प्रश्नांची उत्तर देत नव्हते. काहीतरी आजार आहे हे मान्य करत नव्हते. मी विचारलं, की पूर्वी असा मानसिक त्रास कधी झाला होता का? तेव्हा ७, ८ जण माझ्यावर तुटून पडले. "आम्हाला माहीतच होतं, की सीमाला खोटी वेडी ठरवून शिक्का मारणार आणि डायव्होर्स देणार. मागे असा त्रास झाला होता का, विचारून तिच्या अब्रूवर शिंतोडे उडवू नका." मी म्हणालो, "तिला एखादा आजार नसेल, तर कसा सिद्ध करणार? तुम्हाला टीबी आहे, हे मला सिद्ध करता येईल का?" त्यावर ते म्हणाले, "कारंड्यांच्या डावात तुम्ही पण आहात." मी म्हणालो, "हा दवाखाना आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## भाजपाच्या उमेदवार अश्विनी जगताप यांचा दमदार विजय

# लक्ष्मणभाऊंच्या माघारी; शंकर जगतापांनी घेतली जबाबदारी!

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पाटी-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांनी बाजी मारली. तब्बल ३६ हजार ९१ मतांच्या फरकाने ही जागा जिंकली. या लक्षवेधी विजयात चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी "परफेक्ट नियोजन आणि करेक्ट कार्यक्रम" अशी कामगिरी केली आहे. लक्ष्मणभाऊंच्या माघारी; शंकर जगताप यांनी निभावली चिंचवडची जबाबदारी... अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**

### » प्रतिकूल परिस्थितीतही महाविकास आघाडीला रोखले



पुण्यातील कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाला धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. यापूर्वी झालेल्या पोटनिवडणुका आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीतसुद्धा भाजपाच्या विरोधात जनमत गेले होते. त्यामुळे चिंचवडमध्ये 'परिवर्तन' होणार, असा दावा केला जात होता.

वास्तविक, या निवडणुकीत शंकर जगताप यांचे नाव उमेदवारीसाठी आघाडीवर होते. मात्र, भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी अश्विनी जगताप यांना उमेदवारी दिली. कारण, ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशीच अपेक्षा होती. मात्र, महाविकास आघाडी आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी निवडणूक लढवण्याची ठाम भूमिका घेतली. दिवंगत लक्ष्मण जगताप यांचे निधन दि. ३ जानेवारी २०२३ रोजी झाले. जगताप कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला. अशाचत महिन्याभरातच निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीची घोषणा केली. मोठा भाऊ गेल्याचे दु:ख आणि कुटुंबाला आधार देण्याची जबाबदारी सांभाळत असतानाच कोणत्याही परिस्थिती भाजपाशी पक्षनिष्ठा ठेवणार असल्याची घोषणा शंकर जगताप यांनी केली.

भाजपाकडून अश्विनी जगताप यांचे नाव उमेदवारीसाठी निश्चित करण्यात आले. त्यानंतरसुद्धा ही निवडणूक बिनविरोध होईल, असे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. निवडणूक लागल्यामुळे स्वत:चे दु:ख बाजुला सारुन भाजपासाठी आणि दिवंगत जगताप यांचा 'चिंचवडचा गड' राखण्यासाठी अत्यंत धाडसाने शंकर जगताप यांनी निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली.

दिवंगत जगताप राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना व्यावसाय आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या शंकर जगताप यांच्यावर आपल्या वहिनी अश्विनी जगताप यांना निवडून आणण्याचे मोठे आव्हान होते. भाजपाविरोधात वातावरण असतानाही शंकर जगताप यांनी ही 'रिस्क' घेतली. गेल्या दोन वर्षांपूर्वी भाजपाने शंकर यांच्याकडे चिंचवड विधानसभा निवडणक प्रभारी अशी जबाबदारी सोपवली होती. त्यामुळे दिवंगत जगताप आजारी असल्यामुळे त्यांनी मतदार संघाची जबाबदारी सक्षमपणे हाताळली होती. तसेच, भाजपाबाबत निर्णय प्रक्रियेत शंकर जगताप यांचा सहभाग होता.

### शंकर जगताप यांनी नेतृत्वाची चुणूक दाखवली..

**» शंकर जगताप यांच्याकडे महापालिका नगरसेवक पदाचा अनुभव आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने त्यांनी नेतृत्वाची चुणूक दाखवली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्याबाबत चिंचवड भाजपामध्ये काही नगरसेवक नाराज होते. मात्र, शंकर जगताप यांनी काही नाराजांचा सोबत घेतले. तसेच, राजकीय तत्वांशी तडजोड नाही... अशी कठोर भूमिका घेत काहीजणांना बाजूला ठेवले. मतदार संघातील १३ गावांमध्ये शकर जगताप यांनी आपली यंत्रणा कामाला लावली. गावकी-भावकी आणि नाती-गोती यांच्या आव्हानात्मक परिस्थितीत आपल्या वहिनी अश्विनी जगताप यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहिले. विशेष म्हणजे, प्रमुख प्रतिस्पर्धी असलेले अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रभागात भाजपाला मताधिक्य मिळाले. कारण, शंकर जगताप यांनी मतांचे गणित अचूक साधले. त्यामुळे या निवडणुकीत शंकर जगताप यांच्या प्रभावी नेतृत्वाची चुणूक दिसली. या निवडणुकीच्या विजयाचे शिल्पकार म्हणून शंकर जगताप यांनी आपली ओळख निर्माण केली.**

---

# नागालँडमध्ये आरपीआयचा निळा झेंडा फडकला!

### » पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रिपाइंच्या मध्यवर्ती कार्यालयात फटाके वाजवून नाचून आनंद साजरा केला

। मुंबई । महाईन्यूज ।

**नागालँड विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन आठवले पक्षाचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. टूएनसंद सदर- 2 विधानसभा मतदारसंघात इम्तिचोबा तर नोकसेन विधानसभा मतदारसंघात पक्षाचे अधिकृत उमेदवार वाय. लिमा ओनेन चँग हे विजयी झाले आहेत.**



नागालँड मध्ये गन्ना किसान ( ऊस शेतकरी) या चिन्हावर पक्षाच्या उमेदवारांनी 8 ठिकाणी निवडणूक लढली आणि त्यात 2 उमेदवार विजयी झाले. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रिपाइंच्या मध्यवर्ती कार्यालयात फटाके वाजवून नाचून आनंद साजरा केला. रामदास आठवले यांनी ढोल वाजवून विजयाचा जल्लोष साजरा केला. निवडून आलेले रिपाइं चे दोन्ही आमदार नागालँड मध्ये भाजप एनडीपीपीच्या युतीला सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देतील.

# सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने आमच्या आशेला अंकूर फुटला; उद्धव ठाकरेंना दुहेरी दिलासा

। मुंबई । महाईन्यूज ।

**सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या नेमणुकीबाबत जाहर केलेल्या निर्णयावर उद्धव ठाकरे यांनी समाधान व्यक्त केलं आहे. देशामध्ये लोकशाही जीवंत राहावी, यासाठी आमचा लढा आहे. आमच्या आशेला अंकूर फुटला, अशा भावना उद्धव ठाकरेंनी व्यक्त केल्या.**




निवडणूक आयोगाच्या नेमणुकासुद्धा निवडणुकीने व्हायला पाहिजेत, असं उद्धव ठाकरे धनुष्यबाणाच्या निकालानंतर म्हणाले होते. आयोगाच्या नेमणुकीत सर्वसमावेशकता हवी ही त्यांची मागणी होती. आज घटनापीठाने महत्त्वाचा निकाल देत किमान प्रक्रियाबदल केला आहे. आता निवडणूक आयोगाच्या सदस्यांच्या नेमणुकीसाठी पंतप्रधान, विरोधी पक्षनेते सरन्यायाधीश यांची समिती राष्ट्रपतींकडे शिफारस करणार, त्यानंतर आयोगाची निवड होणार. सध्या केवळ पंतप्रधानांच्या सल्ल्याने राष्ट्रपती नेमणुका करत होते. यावर उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत भाष्य केलं आहे.

# तीन राज्यात भाजप युतीची हवा!

## आरपीआय 2, राष्ट्रवादीला 7 जागा



।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**ईशान्य भारतातील त्रिपुरा, नागलँड आणि मेघालय या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आले आहेत.** त्रिपुरा आणि नागालँडमध्ये भाजपयुतीनं पूर्ण बहुमत मिळवलं आहे. तर मेघालयात भाजपचा जुना सहकारी एनपीपी हा पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळं जर भाजपसोबत पुन्हा युती झाली तर मेघालयातही भाजप सत्तेत येऊ शकतं. पण सर्वात मोठी गोष्ट म्हणजे काँग्रेसला या तिन्ही राज्यांमध्ये मोठा फटका बसला आहे.

दरम्यान, नागालँडमध्ये केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अर्थात रिपाइंचे दोन आमदार निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसलाही इथं ७ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळं महाराष्ट्रातील चिंचवडची पोटनिवडणूक जरी राष्ट्रवादीनं गमावली असली तरी नागालँडमध्ये चांगला विजय मिळाला आहे.

### नागालँडमध्ये महिलांसाठी आजचा मोठा दिवस

» नागालँडच्या विधानसभा निवडणुकीत इतिहास रचला गेला आहे. राज्यात पहिल्यांदाच महिला उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला आहे. यामध्ये दीमापूर तृतीय विधानसभेच्या हेकानी जखालू यांनी विजय मिळवला. हेकानी यांना भाजपा आणि एनडीपीपी युतीनं उमेदवारी दिली होती. तसेच याच युतीची आणखी एक महिला उमेदवार सलहुतुनू क्रुसे यांनीही पश्चिम अंगामी जागेवरुन विजय मिळवला आहे. त्यामुळं महिला आमदार पहिल्यांदाच विधानसभेत दाखल होणार आहेत.

### तिन्ही राज्यांत कसं आहे बलाबल?

त्रिपुरा - एकूण जागा ६०
भाजप - ३२
मार्क्सवादी काँग्रेस पार्टी - ११
काँग्रेस - ३
इतर - १४

नागालँड - एकूण जागा ६०
भाजप - १२
काँग्रेस - ७
एनडीपीपी - २५
आरपीआय - २
राष्ट्रवादी काँग्रेस - ७
इतर - १४

मेघालय - एकूण जागा ६०
भाजप - २
काँग्रेस - ५
तृणमूल काँग्रेस - ५
एनपीपी - २६
इतर - २१

---

## आयपीएस अधिकारी रश्मी शुक्लांची पोलीस महासंचालक पदी बढती

### तपास अंती रश्मी शुक्लाना काही महिन्यांपूर्वी दिलासा, आरोपातून मुक्तता

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांचे बेकायदा कथित फोन टॅपिंग प्रकरणी वादग्रस्त ठरलेल्या आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालकपदी बढती देण्यात आली आहे. कॅबिनेट नियुक्ती समितीने शनिवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत 1988 आणि 1999 च्या तुकडीतील 20 अधिकाऱ्यांना बढती दिली. त्यात रश्मी शुक्ला यांच्यासह सदानंद दाते आणि अतुलचंद्र कुलकर्णी यांचादेखील आहे.

आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला या मार्च 2016 ते जुलै 2018 या कालावधीत पुण्याच्या पोलीस आयुक्त होत्या. त्या सध्या केंद्रात प्रतिनियुक्तीवर असून हैद्राबाद येथे केंद्रीय राखीव दलाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक आहेत.

राज्यात 2019 मध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांसह इतर काही नेत्यांचे बेकायदा कथित फोन टॅपिंग केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. त्यानंतर, कुलाबा पोलीस ठाण्यात शुक्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर तपास अंती काही महिन्यांपूर्वी रश्मी शुक्लाना दिलासा मिळत आरोपातून मुक्तता झाली होती.

### रश्मी शुक्ला पोलीस महासंचालक पदी बढती

» आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला या मार्च 2016 ते जुलै 2018 या कालावधीत पुण्याच्या पोलीस आयुक्त होत्या. त्या सध्या केंद्रात प्रतिनियुक्तीवर असून हैद्राबाद येथे केंद्रीय राखीव दलाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक आहेत.

---

## एक देश, एक वीज दर' धोरण करण्याची बिहारच्या मुख्यमंत्र्यांची मागणी

### विजेच्या किमतीमध्ये समानता आणण्याची तात्काळ गरज

।पटना ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'एक देश, एक रेशन कार्ड' योजनेप्रमाणे 'एक देश, एक वीज दर' कायदा करण्याची मागणी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बुधवारी (१ मार्च) पुन्हा एकदा केली. बिहार विधानसभेच्या संयुक्त बैठकीत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी ही भूमिका मांडली. विजेच्या किमतीमध्ये समानता आणण्याची तात्काळ गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**



प्रत्येक राज्य देशाच्या उभारणीत निर्णायक भूमिका बजावतो. राज्याच्या रचनात्मक सहभागाशिवाय देशाच्या सर्वसमावेशक विकासाचा विचार होऊ शकत नसल्याचे नितीश कुमार म्हणाले. देशात 'एक देश, एक वीज दर' धोरण असायला हवे, असे ते यापूर्वी देखील म्हणाले होते. काही राज्ये केंद्र सरकारच्या वीजनिर्मिती कंपन्यांकडून जास्त दराने वीज का विकत घेत आहेत? असा प्रश्नही नितीश कुमार यांनी उपस्थित केला.बिहार विधानसभेच्या संयुक्त बैठकीत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना नितीश कुमार म्हणाले की, बिहारला इतर राज्यांच्या तुलनेत केंद्र सरकारच्या वीजनिर्मिती प्रकल्पातून जास्त दराने वीज मिळते. त्यामुळे देशात एक समान वीजदर झाले पाहिजेत आणि केंद्र सरकारला 'एक देश, एक वीज दर' योजना आणण्याचा विचार करायला हवा, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बिहार राज्याला विशेष दर्जा देण्याच्या मागणीचाही पुनरुच्चार करतानाच केंद्राच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकार मागासलेल्या राज्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीकाही त्यांनी केली.

### मोदींनी मांडली होती पोलिसांच्या गणवेशाबद्दल संकल्पना

» हरियाणातील सूरजकुंडमध्ये सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये दोन दिवशीय चिंतन शिबीराचे आयोजन केले होते. या शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांनी देशभरातील सर्व राज्यांच्या पोलिसांसाठी एकच समान गणवेशाचा मुद्दा विचारात घ्यावा, असे पंतप्रधानांनी सांगितले होते. या प्रक्रियेला वेळ लागू शकतो. 5, 50 किंवा 100 वर्षे लागू शकतात, परंतु आपण याचा विचार केला पाहिजे, असेही मोदी म्हणाले. असे केल्यास देशभरातील नागरिक देशभरात कुठेही पोलीस कर्मचाऱ्यांना लगेच ओळखू शकतील आणि त्याचबरोबर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांना देशभरात समान ओळख प्राप्त होईल, तसेच राज्यांच्या गणवेशांवर त्यांचे विशिष्ट क्रमांक किंवा चिन्हे असू शकतात. 'एक राष्ट्र, एक पोलीस गणवेश' ही संकल्पना मी केवळ तुमच्या विचारार्थ मांडतो आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले.

# 'आरआरआर'ची क्रेझ कायम, अमेरिकेत 1647 आसनी शो हाऊसफुल्ल

एसएस राजामौली यांचा 'RRR' चित्रपट मार्च 2022 मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. जवळपास वर्षभरानंतरही चित्रपटाची जादू कायम आहे. ज्युनियर NTR आणि राम चरण स्टारर चित्रपट ऑस्कर प्रमोशनसाठी 1 मार्च रोजी यूएस मध्ये जगातील सर्वात मोठा स्क्रीनिंग म्हणून पुन्हा रिलीज झाला आहे.

हा स्क्रिनिंग बंपर हाउसफुलसह पुन्हा एकदा इतिहास रचत आहे. 'RRR' साठी 1,600 हून अधिक तिकिटे विकली गेली आणि बरेच लोक भव्य स्क्रीनिंगसाठी लांब रांगेत उभे असलेले दिसले.

ऑस्कर 2023 पूर्वी, पुन्हा एकदा चाहत्यांनी थिएटरमध्ये



'RRR' ला गर्दी केली होती. चित्रपटाच्या निर्मात्यांनी ट्विटरवर अमेरिकेतील थिएटरच्या काही झलक शेअर केल्या आहेत. काही मिनिटांतच हा शो हाऊसफुल्ल झाला आणि चाहते पुन्हा चित्रपट पाहण्यासाठी लांब रांगेत उभे राहिले. 12 मार्च रोजी होणाऱ्या 95 व्या अकादमी पुरस्कारापूर्वी निर्मात्यांनी हे विशेष स्क्रीनिंग तयार केले आहे.'RRR' मधील 'नाटू नाटू' या गाण्याला ऑस्कर 2023 साठी सर्वोत्कृष्ट गाण्याच्या श्रेणीत नामांकन मिळाले आहे. आणखी एक बातमी म्हणजे राहुल सिपलीगुंज आणि काल भैरव या गायकांकडून हे गाणे स्टेजवर लाईव्ह सादर केले जाणार आहे.12 मार्च रोजी लॉस एंजेलिस येथील डॉल्बी थिएटरमध्ये 95 व्या अकादमी पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले आहे. राजामौली, एनटीआर, चरण आणि 'आरआरआर'ची संपूर्ण टीम ग्रँड नाईटमध्ये सामील होण्यासाठी सज्ज झाली आहे.'RRR' हा स्वातंत्र्यसैनिक अल्लुरी सीताराम राजू आणि कोमाराम भीम यांच्या जीवनातील काल्पनिक कथेवर आधारित आहे, ज्यामध्ये राम चरण आणि जूनियर एनटीआर मुख्य भूमिकेत आहेत.


हा चित्रपट 25 मार्च 2022 रोजी भारतातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला, त्यानंतर तो जपान आणि अमेरिकेतही प्रदर्शित झाला. आलिया भट्ट, अजय देवगण, श्रिया सरन यांसारखे कलाकारही या चित्रपटात दिसले होते. 300 कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या 'RRR' चित्रपटाने जगभरात बॉक्स ऑफिसवर 1500 कोटींहून अधिक कमाई केली आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होऊनही प्रेक्षक मोठ्या पडद्यावर 'आरआरआर' पाहत आहेत.

# 'बॉयकॉट' करायला फार मजा येते का?' रणबीर संतापला!

आम्ही तुमचे मनोरंजन करतो आणि तुम्ही आम्हालाच सारखे ट्रोल करता हे तुम्हाला आवडते का, आणि तुम्ही असे का करता असा प्रश्न रणबीरनं नेटकऱ्यांना, चाहत्यांना केला तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. रणबीरचा मूड काही वेगळाच असल्याचे त्यांना जाणवले.

गेल्या काही महिन्यांपासून बॉलीवूडमध्ये वेगळ्याच प्रकारचे वारे वाहत आहेत. हिंदी चित्रपटसृष्टी विरुद्ध दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी असा वाद झाला आहे. मागच्या वर्षापासून हा वाद चर्चेत आला आहे. कोरोनाच्या काळात टॉलीवूडच्या चित्रपटांना बॉलीवूडच्या प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले होते.येत्या दिवसांत रणबीर आणि श्रद्धा कपूरचा तू झुठी मैं मक्कार नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. त्याच्या प्रमोशनच्या निमित्तानं रणबीर वेगवेगळ्या ठिकाणी मीडियाशी संवाद साधतो आहे. यावेळी त्यानं बॉयकॉट बॉलीवूडवर आपली रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे तो चर्चेत आला आहे. लव रंजन यांनी दिग्दर्शित केलेल्या तू झुठी मैं मक्कार चित्रपटाची चाहते आतूरतेनं वाट पाहत आहे.या चित्रपटाचा टीझर आणि ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्याची चर्चा सुरु झाली. श्रद्धा कपूरसोबतच्या गाण्याला प्रेक्षकांनी पसंती मिळताना दिसत आहे. यावेळी रणबीरला जेव्हा बॉयकॉट बॉलीवूडवरुन प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यानं दिलेलं उत्तर अनेकांच्या चर्चेचा विषय ठरतो आहे. रणबीर म्हणाला, असं काय कारण आहे की तुम्ही आम्हाला बॉयकॉट करण्याचा विचार करता.काहीही झालं की बॉयकॉट हा ऑप्शन आहे का, तुम्ही आम्हाला बॉयकॉट करता तेव्हा तुम्हाला फार मजा वाटते का, मला यावर जास्त काही बोलायचे नाही.

नोरंजनाचे माध्यम म्हणून चित्रपटाकडे पाहा,
बाकी कसला विचार
करु नका.



# फक्त 'प्राजक्तराज' या ज्वेलरी ब्रॅन्डचीच नाही तर पुण्यातील 'या' बिझनेसची देखील आहे मालकीण

हे नाव आज मराठी सिनेइंडस्ट्रीतच नाही तर सोशल मीडियावरचं देखील चर्चेतलं नाव आहे. मराठी मालिका विश्वातून प्राजक्तानं अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलं. तिच्या 'जुळून येती रेशीमगाठी' या पहिल्याच मालिकेनं तिला भरभरून यश मिळवून दिलं.पुढे तिनं काही सिनेमे केले पण तिच्या 'रानबाझार' या वेबसीरिमधील तिच्या अभिनयाला खरी दाद मिळाली. आज प्राजक्ता सोशल मीडियावरही अधिक फॉलोअर्स असलेल्या अभिनेत्रींमध्ये गणली जाते.आता तर केवळ अभिनेत्रीच नाही तर बिझनेसवूमन म्हणूनही तिला ओळखलं जातं.प्राजक्ता सोशल मीडियावर भलतीच सक्रिय असलेली पहायला मिळते. ती अनेकदा ज्या पोस्ट करते त्या नेहमीच चर्चेत आलेल्या पहायला मिळतात. तिनं नुकताच 'प्राजक्तराज' हा तिचा ज्वेलरी ब्रॅन्ड लॉंच केला. तिच्या या ब्रॅन्डच्या लॉन्चिंग आधी बिझनेस क्षेत्रात पाऊल ठेवण्याची घोषणा तिनं खास अंदाजात केलेली आपण सगळ्यांनीच पाहिली. पारंपरिक दागिने 'प्राजक्तराज' या तिच्या ब्रॅन्ड अंतर्गत विकले जातात. आज बऱ्यापैकी या ब्रॅन्डचे दागिने लोक विकत घेताना दिसतात. 'प्राजक्तराज'ची मालकीण म्हणून प्राजक्ता माळीची ओ ळ ख समोर येत असताना आता तिच्या पुण्यातील आणखी एका बिझनेसविषयी माहिती समोर आली आहे. प्लॅनेट मराठी या ओटीटी प्लॅटफॉर्मवर नुकत्याच सुरु झालेल्या 'पटलं तर घ्या' या चॅट शो मध्ये प्राजक्ता माळी गेस्ट म्हणून आली होती. तेव्हा तिला विचारलं गेलं होतं की, 'दुसऱ्या अभिनेत्रींचे यश पाहून तुला काही वाटतं का?' तेव्हा प्राजक्ता म्हणाली,"मला काही वाटत नाही. माझ्या ते स्वभावात नाही. कारण अभिनयक्षेत्रात यायचं मी काही ठरवलं नव्हतं. मी खरंतर क्लासिकल डान्सर आहे. माझे स्वतःचे पुण्यात क्लासेस आहे..जे आजही मी चालवते". आणि अशाप्रकारे प्राजक्ताचा हा दुसरा बिझनेस सर्वांसमोर आला.





# वीणा जगतापचा 'कार'नामा

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून वीणा जगतापला ओळखले जाते. ती कायमच चर्चेत असते. वीणा ही सध्या यशाच्या पायऱ्या चढताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी वीणाने अधिकृत मेकअप आर्टिस्ट म्हणून पदवी संपादन केली. त्यानंतर आता वीणाने चाहत्यांना आणखी एक गुडन्यूज दिली आहे.वीणा जगताप ही सोशल मीडियावर कायम सक्रीय असते. नुकतंच वीणाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टद्वारे तिने तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. वीणाने नुकतंच एक नवीकोरी गाडी खरेदी केली आहे. तिने तिच्या गाडीबरोबरचा एक फोटो पोस्ट केला आहे.

# प्राजक्ताला सर्वांसमोर बोलता बोलता रडू कोसळलं



मालिकेत छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी येसूबाईंची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड. प्राजक्ता गायकवाडला संभाजी मालिकेतून कमालीची लोकप्रियता मिळाली. प्राजक्ता सोशल मीडियावर चाहत्यांच्या संपर्कात असते. प्राजक्ताचा एक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झालाय. या व्हिडिओत प्राजक्ताला सर्वांसमोर बोलता बोलता रडू कोसळलं. प्राजक्ताला सर्वांसमोर का रडू कोसळलं याचं कारण म्हणजे प्राजक्ताचे आजोबा कै. तुकाराम हरिभाऊ खेडकर यांचं प्रथम पुण्यस्मरण होतं.

## भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका

# भारत पराभवाच्या छायेत!

### » दुसरा डावही गडगडला: ऑस्ट्रेलियाला 76 धावांचे किरकोळ लक्ष्य; लायनचे आठ बळी

।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**चेतेश्वर पुजाराचा अपवाद वगळता भारताचे फलंदाज ऑस्ट्रेलियाविरुद्ध तिसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावातही अपयशी ठरले. ऑफ-स्पिनर नेथन लायनच्या (८/६४) उत्कृष्ट माऱ्यापुढे भारताचा दुसरा डाव केवळ १६३ धावांत गडगडला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजयासाठी केवळ ७६ धावांचे आव्हान मिळाले असून पहिल्या दोन कसोटी सामन्यांप्रमाणे या सामन्याचा निकालही अडीच दिवसांतच लागणे अपेक्षित आहे**

.इंदूरच्या होळकर स्टेडियमवरील आव्हानात्मक खेळपट्टीवर दुसऱ्या दिवशीही गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळाला. भारताच्या पहिल्या डावातील १०९ धावांच्या प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा डाव १९७ धावांवर आटोपला. मात्र, त्यांना ८८ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवण्यात यश आले. भारताने दुसऱ्या डावातही सुरुवातीपासून ठरावीक अंतराने गडी गमावले. लायनने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करताना भारतीय फलंदाजांना अडचणीत टाकले. एका बाजूने गडी बाद होत असताना दुसऱ्या बाजूने पुजाराने (१४२ चेंडूंत ५९) संयमी खेळी केली. त्याने या खेळीदरम्यान पाच चौकार व एक षटकारही मारला. परंतु त्याच्या व्यतिरिक्त भारताचा एकही फलंदाज ३० धावा किंवा चेंडूंचा टप्पा ओलांडू शकला नाही.



भारताच्या दुसऱ्या डावात लायनने शुभमन गिल (५) आणि कर्णधार रोहित शर्मा (१२) यांना झटपट माघारी धाडले. विराट कोहलीने काही चांगले फटके मारले, पण १३ धावांवर त्याला मॅथ्यू कुनमनने पायचीत पकडले. रवींद्र जडेजा (७) लायनच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर श्रेयस अय्यरने आक्रमक शैलीत फलंदाजी करताना २७ चेंडूंत तीन चौकार व दोन षटकारांच्या मदतीने २६ धावा फटकावल्या. परंतु मिचेल स्टार्कच्या गोलंदाजीवर उस्मान ख्वाजाने त्याचा अप्रतिम झेल पकडला. मग लायनने केएस भरत (३), अश्विन (१६) आणि उमेश यादव (०) यांना माघारी पाठवले. दरम्यान पुजाराने १०८ चेंडूंत मालिकेतील आपले पहिले अर्धशतक पूर्ण केले. परंतु ५९ धावांवर त्याचा लायनच्या गोलंदाजीवर 'लेग-स्लीप'मध्ये उभ्या स्टीव्ह स्मिथने एका हातात उत्कृष्ट झेल पकडला. मग लायनच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात मोहम्मद सिराज खातेही न उघडता बाद झाला आणि भारताचा डाव १६३ धावांवर संपुष्टात आला. अक्षर पटेल (१५) या डावातही नाबाद राहिला.

तत्पूर्वी, दिवसाच्या सुरुवातीला ४ बाद १५६ धावांवरून पुढे खेळणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १९७ धावांवर आटोपला. ऑस्ट्रेलियाचा संघ एकवेळ ४ बाद १८६ अशा सुस्थितीत होता. मात्र, त्यांनी यापुढे ११ धावांतच सहा गडी गमावले. वेगवान गोलंदाज उमेश यादव (३/१२) आणि ऑफ-स्पिनर अश्विन (३/४४) यांच्या प्रभावी माऱ्यापुढे ऑस्ट्रेलियाच्या तळाच्या फलंदाजांचा निभाव लागला नाही. पीटर हॅण्डस्कॉम (१९) आणि कॅमरुन ग्रीन (२१) यांनाच काहीशी झुंज देता आली.

### लायनने कुंबळेचा विक्रम मोडला

**» नेथन लायनने भारताच्या दुसऱ्या डावात आठ गडी बाद करण्याची किमया साधली. यासह त्याने भारत-ऑस्ट्रेलिया या संघांमधील कसोटी सामन्यांमध्ये सर्वाधिक बळींचा विक्रमही आपल्या नावे केला आहे. लायनने २५ सामन्यांत ११३ बळी मिळवले असून त्याने भारताचा दिग्गज लेग-स्पिनर अनिल कुंबळेचा (२० सामन्यांत १११ बळी) विक्रम मोडीत काढला.**

---



## नॅथन लायनने एकट्यानेच वाजवला भारताचा बँड !

### » टीम इंडियाविरुद्ध 'ही' कामगिरी करणारा ठरला पहिलाच गोलंदाज

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात चार सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना इंदोरमध्ये खेळला जात आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज नॅथन लायनने भारताविरुद्ध मोठी कामगिरी केली आहे. त्याने भारताच्या दुसऱ्या डावात एकूण ८ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. तसेच नॅथनने दुसऱ्यांदा भारताविरुद्ध आपली सर्वोत्तम कामगिरी दाखवली..**

भारत पहिल्या डावाच्या आधारे ऑस्ट्रेलियापेक्षा ८८ धावांनी पिछाडीवर पडला होता. त्यानंतर भारतीय संघ दुसऱ्या डावात नॅथन लायनच्या फिरकीच्या जाळ्यात गारद झाला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात भारताच्या पाहुण्या गोलंदाजाने दुसऱ्यांदा ८ बळी घेण्याची ही पहिलीच वेळ आहे.

इंदोरच्या होळकर स्टेडियमवर भारत विरुद्ध खेळल्या जात असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात नॅथन लायनने तीन बळी घेतले. दुसऱ्या डावात त्याने भारताच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याने भारताच्या ८ फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवले. त्याने ६४ धावांत ८ बळी घेतले. लायनने दुसऱ्यांदा असा पराक्रम केला. याआधी त्याने २०१७ मध्ये बंगळुरू येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात ५० धावांत ८ बळी घेतले होते. भारतीय संघाचा दुसरा डाव ६०.३ षटकांत १६३ धावांवर गडगडला. या डावातील टीम इंडियाच्या आठ फलंदाजांना नॅथन लायनने आपल्या जाळ्यात अडकवले. ज्यामध्ये रोहित शर्मा (१२), शुभमन गिल (५), चेतेश्वर पुजारा (५९), रवींद्र जडेजा (७), श्रीकर भरत (३), अश्विन (१६), उमेश यादव (०) आणि मोहम्मद सिराज (०) या फलंदाजांचा समावेश होता.

### भारतातील पाहुण्या गोलंदाजाची आकडेवारी

**» १०/११९ एजाज पटेल, मुंबई २०२१-२२**
**८/५० नॅथन लायन, बंगळुरु २०१६-१७**
**८/६४ लान्स क्लुसेनर, कोलकाता १९९६-९७**
**८/६४ नॅथन लायन, इंदूर २०२२-२३***

### ऑस्ट्रेलियाला 76 धावांचे लक्ष्य

**» यानंतर टीम इंडियाचा दुसरा डाव अवघ्या १६३ धावांवर आटोपला. मोहम्मद सिराज शेवटची विकेटच्या रुपाने म्हणून बाद झाला. त्याने ७ चेंडू खेळले आणि त्याला एकही धाव करता आली नाही. ऑस्ट्रेलियन गोलंदाज नॅथन लायनने शानदार गोलंदाजी करताना ८ बळी घेतले. ऑस्ट्रेलियाला ७६ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलिया या लक्ष्याचा पाठलाग करेल.**

## तिहेरी उडीपटू ऐश्वर्यावर चार वर्षांची बंदी

। पीटीआय। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताची आघाडीची तिहेरी उडीपटू ऐश्वर्या बाबूवर राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्थेच्या (नाडा) शिस्तपालन समितीने चार वर्षांची बंदी घातली आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेदरम्यान घेण्यात आलेल्या चाचणीत ऐश्वर्याने 'ओस्टारीन' या बंदी घातलेल्या उत्तेजक द्रव्याचे सेवन केल्याचे निष्पन्न झाले होते.

ऐश्वर्याला १३ फेब्रवारी रोजी 'नाडा'च्या शिस्तपालन समितीकडून बंदीचे पत्र मिळाले होते. या बंदीला आव्हान देण्यासाठी तिच्याकडे ६ मार्चपर्यंतचा कालावधी आहे.२५ वर्षीय ऐश्वर्या गेल्या वर्षी बर्मिगहॅम येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार होती, परंतु जागतिक उत्तेजक प्रतिबंधक संस्थेने (वाडा) बंदी घातलेले उत्तेजक द्रव्य शरीरात



आढळल्याने ऐश्वर्या आणि धावपटू एस. धनलक्ष्मी यांना राष्ट्रकुल स्पर्धेसाठीच्या भारतीय चमूतून वगळण्यात आले होते.

गेल्या वर्षी १३ व १४ जूनला चेन्नई येथे झालेल्या आंतरराज्य अजिंक्यपद राष्ट्रीय स्पर्धेदरम्यान ऐश्वर्याची चाचणी घेण्यात आली होती. या स्पर्धेत ऐश्वर्याने तिहेरी उडीमध्ये सुवर्णपदकाची कमाई करतानाच १४.१४ मीटर अंतराचा राष्ट्रीय विक्रम रचला होता. उत्तेजक सेवनात दोषी आढळल्यामुळे गेल्या वर्षी जुलैमध्येच ऐश्वर्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली होती.